नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - २३७ | Issue - 237 | वार शुक्रवार दि. १६ जानेवारी २०२६ | Blow- Friday Date 16 January 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# मुंबईत भाजपची सत्ता येण्याचा अंदाज

## ठाकरेंच्या २५ वर्षांच्या सत्तेला भाजपचा सुरुंग? मुंबईचा सर्वात धक्कादायक एक्झिट पोल समोर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महानगरपालिकेसाठी मतदान प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आता सर्वात मोठा एक्झिट पोल समोर आला आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर ठाकरेंना मात्र जोरदार धक्का बसणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे गेल्या २५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरेंना हा धक्का असेल.

मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान पार पडलं. त्याचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार आहे. त्या आधी या निकालाचा अंदाज वर्तवणारे एक्झिट पोल समोर आले आहेत.

मुंबई महापालिकेसाठी जनमतचा एक्झिट पोल समोर आला आहे. त्यानुसार भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचवेळी ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त ६२ जागा मिळतील असं म्हटलंय.

दुसरीकडे, काँग्रेस आणि वंचित आघाडीला २० जागा मिळण्याची




शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याचवेळी इतर पक्षांना ७ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

गतउ एक्झिट पोलनुसार, मुंबईत भाजपची सत्ता येणार असून सर्वाधिक मतदान टक्काही त्या पक्षाला मिळणार आहे. या अंदाजानुसार कोणत्या पक्षाला जागा आणि किती टक्के मतदान मिळणार याची आकडेवारी खालीलप्रमाणे,

भाजप शिंदे - १३८
ठाकरे- मनसे - ५९
काँग्रेस-वंचित - २३
इतर - ७

मतांची टक्केवारी किती?
महायुती : ४२-४५%
शिवसेना ठाकरे- मनसे : ३४-३७%
काँग्रेस- वंचित : १३-१५%
इतर : ६-८%

लोकशाही रुद्र रिसर्च एक्झिट पोल

त्याचवेळी लोकशाही आणि रुद्र रिसर्च यांच्याही एक्झिट पोलची आकडेवारी समोर आली आहे. या आकडेवारीनुसार, मुंबईत भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला १२१ जागा मिळतील. तर ठाकरेंच्या युतीला ७१ जागा मिळतील. काँग्रेस आणि वंचितच्या आघाडीला मुंबईत २५ जागा मिळतील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

भाजप शिवसेना - १२१
शिवसेना ठाकरे- मनसे - ७१
काँग्रेस वंचित - २५
इतर - १०

ॲक्सिस माय इंडिया मुंबई एक्झिट पोल
भाजप शिंदे - १३१- १५१
ठाकरे- मनसे - ५८-६८
काँग्रेस-वंचित - १२-१६
इतर - ६-१२

मतदानाची टक्केवारी कशी?
भाजप शिंदे - ४२
ठाकरे- मनसे - ३२
काँग्रेस-वंचित - १३
इतर - १३

जेडीएस मुंबई एक्झिट पोल
भाजप शिंदे - १२७-१५४
ठाकरे- मनसे - ४४-६४
काँग्रेस-वंचित - १६-२५
इतर - ०९-१७

## सोलापुरात पोल्समधील आकडेवारीने सगळेच थक्क

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर: महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा रणसंग्राम अंतिम टप्प्यात आला असून, आज १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. राज्यातील सत्तेचे समीकरण ठरवणाऱ्या या मिनी विधानसभेत कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली असतानाच 'साम टीव्ही'चा खळबळजनक एक्झिट पोल समोर आला आहे. या अंदाजानुसार, सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष स्पष्ट बहुमतासह सत्तेत येण्याची चिन्हे आहेत.

डिसेंबर महिन्यापासून सुरू झालेल्या निवडणूक प्रचारात सोलापूरमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. स्थानिक मुद्द्यांपासून ते राज्याच्या राजकारणापर्यंत अनेक विषय प्रचारात गाजले. अखेर आज मतदारांनी आपला कौल ईव्हीएममध्ये बंद केला आहे. दरम्यान, या एक्झिट पोलने विविध केंद्रांवर घेतलेल्या कलानुसार, सोलापूरकरांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपला झुकते माप दिल्याचे दिसत आहे.

सामच्या एक्झिट पोलनुसार, सोलापूर महापालिकेच्या एकूण जागांपैकी भाजपला सर्वाधिक जागा मिळताना दिसत आहेत. या पोलनुसार सोलापूरची संभाव्य आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.



पक्ष, अंदाजित जागा
भारतीय जनता पार्टी-६२
शिवसेना (एकनाथ शिंदे गट),१५
काँग्रेस (खछउ),१२
राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट),०४
शिवसेना (ठाकरे गट),०२
राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट),०१
एमआयएम-०१
इतर व अपक्ष,०४

या एक्झिट पोलचा सर्वात मोठा धक्का काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांना बसण्याची शक्यता आहे. काँग्रेसला केवळ १२ जागांवर समाधान मानावे लागण्याची चिन्हे असून, भाजपच्या ६२ जागांच्या झंझावातापुढे काँग्रेसचा बालेकिल्ला धोक्यात आल्याचे चित्र आहे. जर हे आकडे निकालात बदलले, तर सोलापूरच्या राजकारणात हा मोठा फेरबदल ठरेल. दुसरीकडे, शिंदे सेनेनेही १५ जागांसह आपली ताकद दाखवून दिली आहे.

मतदारांचा हा कल प्रत्यक्ष निकालात परावर्तित होतो का, हे उद्या १६ जानेवारी रोजी होणाऱ्या मतमोजणीनंतरच स्पष्ट होईल. मात्र, सध्या तरी सोलापूरमध्ये भाजपच्या गोटात उत्साहाचे वातावरण आहे.

## पुण्यात एक्झिट पोल्सनी वाढवली धाकधूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे: मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसह पुणे महानगरपालिकेच्या १६५ जागांसाठीही निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२५ रोजी अधिसूचना जाहीर केली होती. २३ डिसेंबर ते ३० डिसेंबर या कालावधीत उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली. त्यानंतर खऱ्या अर्थाने प्रचाराचा धडाका सुरू झाला. १ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या काळात पुण्याच्या गल्लोगल्लीत राजकीय सभा, पदयात्रा आणि कोपरा सभांचा जोर पाहायला मिळाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शरद पवार यांच्यासह अनेक दिग्गज नेत्यांनी पुण्यात तळ ठोकला होता. मंगळवारी, १३ जानेवारी रोजी सायंकाळी ५:३० वाजता प्रचाराच्या तोफा थंडावल्या आणि आज, १५ जानेवारी २०२६ रोजी शहरात उत्साहात मतदान पार पडले.

आज मतदान संपल्यानंतर प्रसिद्ध झालेल्या विविध एक्झिट पोल्सच्या आकडेवारीनुसार, पुणे महापालिकेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे कठीण दिसत आहे. शहरात प्रामुख्याने भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस आणि शिवसेना (दोन्ही गट) यांच्यात बहुरंगी लढत झाली आहे.

पीआरएबी एक्झिट पोल्सच्या कलानुसार, भाजपला ९३ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ४३ जागा, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेसला पुण्यात ८-८ जागा मिळतील. तर शिंदेंची शिवसेना ७ आणि ठाकरेंची शिवसेना पुण्यात ६ जागांवर जिंकेल असा अंदाज पीआरएबीने व्यक्त केला आहे.

दरम्यान, २०१७ च्या निवडणुकीत भाजपने ९८ जागा जिंकून एकहाती सत्ता मिळवली होती, मात्र यंदा राष्ट्रवादी काँग्रेसमधील फूट आणि महाविकास आघाडीच्या एकजुटीमुळे भाजपच्या जागा काहीशा कमी होताना दिसत आहेत. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस महत्त्वाची भूमिका बजावू शकते. जर भाजपला स्वबळावर बहुमत मिळाले नाही, तर अजित पवार गटाचा पाठिंबा पुण्याचा पुढचा महापौर ठरवण्यासाठी निर्णायक ठरेल. उद्या, १६ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजल्यापासून मतमोजणी होणार आहे. दुपारी २ वाजेपर्यंत पुण्याचा नवा 'कारभारी' कोण असेल हे स्पष्ट होणार आहे.

## पुण्यात गावाकडने आणले मतदार, सोलापुरात कर्नाटकातून गाड्या भरल्या; बोगस मतदारांचा सुळसुळाट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील २९ महापालिकांसाठी आज महानगरांमध्ये मतदानाला सकाळपासूनच सुरुवात झाली आहे. मात्र, बोगस मतदान, मतदान यंत्रातील बिघाड, बोटावरील शाई पुसणे, दुसऱ्याच व्यक्तीने मतदान करुन जाणे यांसह अनेक गैरप्रकार समोर येत आहेत. त्यावरुन, आता विरोधी पक्षातील नेत्यांनी ओरड सुरू केली असून स्थानिक मतदान केंद्रावरील लोकही व्हिडिओच्या माध्यमातून भूमिका मांडत आहेत. त्यातच, पुणे (झींपश), सोलापूर, मुंबई आणि जालन्यासह काही ठिकाणी बोगस मतदार पकडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. सोलापुरात कर्नाटकमधून गाड्या भरुन मतदार (तींळपस) आणल्याचा दावा समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे.

पुण्यातील प्रभाग क्रमांक ४१ चे उमेदवार प्रमोद नाना भानगिरे यांनी स्वतः महादेव वाडी उंड्री या परिसरात एका खासगी गाडीतून ग्रामीण भागातून काही लोकांना मतदानासाठी आणण्यात आल्याचा आरोप केला आहे. नाना भानगिरे हे शिवसेना पुणे शहरप्रमुख आहेत, त्यांनी स्वत: प्रभाग क्रमांक ४१ महादेववाडी उंड्री या प्रभागातील उंड्री चौक येथे बोगस मतदान पकडले आहे आहेत. तसेच, संबंधितांवर पोलिसांनी कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केलीय.

जालन्यात बोगस मतदार ताब्यात

जालन्यातील प्रभाग क्रमांक ९ मधील डबल जिन परिसरामध्ये एका मतदाराने बोगस मतदान केल्याचा संशय मतदान प्रतिनिधींनी केला आहे. या संशयावरून संबंधित मतदाराला पोलिसांनी ताब्यात घेतलं. संशयित मतदाराची सध्या पोलिसांकडून विचारपूस केली



जात आहे, खात्री झाल्यानंतर पुढील कारवाई करणार असल्याचं पोलिसांची सांगितल. संशयित मतदाराने दुसऱ्या नावावर मतदान केल्याचा आरोप मतदान प्रतिनिधींनी केला असून मधुकर देठे असं पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या संशयित मतदाराचे नाव आहे. दरम्यान संशयित मतदाराने कोणत्या नावाने मतदान केलं आहे, याची खात्री संबंधित निवडणूक अधिकाऱ्याकडून घेत असल्याची माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी दिली आहे.

सोलापुरातील प्रभाग १४ मध्ये एमआयएम आणि समाजवादी पक्षात वाद झाल्याचं पाहायला मिळालं. एमआयएमकडून बोगस मतदानासाठी कर्नाटकातून गाड्या आणल्याचा आरोप समाजवादी पक्षाकडून करण्यात आला आहे. जवळपास दोन हजार मतदार बोगस मतदानासाठी आणल्याचा आरोप समाजवादीकडून करण्यात आला. मात्र, हे बोगस मतदार समाजवादी पक्षाकडून पकडल्यानंतर बोगस मतदार माफी मागून निघून गेल्याचा दावाही समाजवादीचे उमेदवार रियाज खरादी यांनी केला आहे.

बोरिवलीत भगवा गार्डने पकडले बोगस वोटर आयडी

बोरिवली प्रभाग क्रमांक १० मध्ये भगवा गार्ड यांनी फेक वोटर आयडी पकडले आहेत. भाजपकडून फेक वोटर आयडी वाटले जाऊन मतदानासाठी लोकांना आणले जात आहे, त्याशिवाय भाजपकडून वोटिंग स्लिप दिल्या जात आहेत असा आरोप भगवा गार्ड यांच्याकडून करण्यात आला. त्यावर मतदान केंद्रावर आक्षेप घेण्यात आला आणि त्यानंतर स्थानिक आमदार मनीषा चौधरी त्यासोबतच भाजप पदाधिकारी यांच्यासोबत गोंधळ झाल्यानंतर पोलिसांनी हस्तक्षेप करत वातावरण शांत करण्याचा प्रयत्न केला.

**सुरक्षा यंत्रणा अलर्ट** — **अमेरिकन उच्चायुक्तांना आदेश**

## समुद्र सीमेवर भारताच्या हद्दीत पाकिस्तानची अल मदीना बोट, ९ जण ताब्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पाकिस्तानकडून पुन्हा भारतात काही दहशतवादी कारवायाचा करण्याचा डाव तर नव्हता ना, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. कारण, भारतीय जवानांनी पाकिस्तानचा एक मोठा कट समुद्र तटावरच उधळून लावला आहे. भारतीय जवानांनी पाकिस्तानच्या 'अल मदीना' या समुद्र बोटीला ताब्यात घेतलं असून या बोटीतून भारतीय हद्दीत येणाऱ्या ९ जणांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्यामुळे, पाकिस्तानकडून पुन्हा एकदा समुद्रमार्गे भारतात येऊन काही दहशतवादी कारवाया करण्याचा डाव तर नव्हता ना? याचा तपास भारतीय सैन्य दलाकडून होत आहे.

भारतात पाकिस्तानातून आलेल्या दहशतवाद्यांनी काश्मीर खोऱ्यातील पहलगाममध्ये निष्पाप नागरिकांवर गोळ्या झाडल्या. त्यामध्ये, २० पेक्षा जास्त भारतीय मृत्यूमुखी पडले होते. या हल्ल्यानंतर देशभरातून तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. तर, पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही या हल्ल्याच दखल घेत, पाकिस्तानवर एअर स्ट्राईक घडवून आणला होता. त्यामुळे, दोन्ही देशातील सीमारेषेवर अधिकच तणाव निर्माण झाला होता. मात्र, जागतिक स्तरावरील चर्चेनंतर दोन्ही देशांच्या सैन्य दलाने युद्धविराम दिला. मात्र, आता भारतीय समुद्र सीमारेषेवर गुजरातजवळ



भारतीय तटरक्षक दलाने पाकिस्तानचा मोठा डाव उधळून लावला आहे.

भारतीय तटरक्षक दलाने पाकिस्तानची अल मदीना नावाची बोट पकडली असून त्यातील ९ जणांना अटक केली आहे. या सर्व संशयीतांना गुजरातच्या पोरबंदर येथे आणले जात आहे. भारताची समुद्र सीमा आता सर्वसाधारण नाही, हे भारतीय सैन्य दलाने दाखवून दिलंय. अरबी समुद्रात १४ जानेवारीच्या मध्यरात्री मोठा काळोख असताना, भारतीय तटरक्षक दलाची बोट पेट्रोलिंग करत होती. त्यावेळी, समुद्र तटावर एक संशयीत हालचाल दिसून आल्याने भारतीय सैन्याने गंभीर दखल घेऊन पाठलाग केला. आंतरराष्ट्रीय समुद्र सीमा रेषेवर भारतीय हद्दीत एक बोट गपचूप शांतपणे पुढे जात होती. ही केवळ मच्छिमार करणारी बोट नव्हती, तर त्यातील सर्वांच्या हालचाली संशयास्पद होत्या. त्यामुळे, भारतीय सैन्य दलाची बोट तिकडे आगेकूच होताच, त्या बोटीने पाकिस्तानच्या दिशेने पिछेहट केल्याचं दिसून आलं. तसेच, पाकिस्तानी बोटीने आपला स्पीडही वाढवत पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, भारतीय तटरक्षक दलाच्या जवानांनी या बोटीच्या मुसक्या आवळल्या.

दरम्यान, या बोटीसह संशयीत ९ जणांना पोरबंदर येथील सीमा रेषेवर आणण्यात आले असून भारतीय सुरक्षा एजन्सीज म्हणजेच आयबी, रॉ आणि एटीएसनेही या बोटीतील संशयीतांच्या अनुशंगाने तपास सुरू केला आहे.

**नावात बदल**

**माझे जुने नाव: भिमराव टोपु राठोड असे होते ते मी बदलुन माझे नवीन नाव: भिमु टोपु राठोड (मु. पो. म्हेत्रे नगर तांडा दुधनी तालुका अक्कलकोट जिल्हा सोलापूर) असे केले आहे. तरी मला आजपासून माझ्या नवीन नावाने ओळखावे.**
**Bhimarao Topu Rathod (old Name)**
**Bhimu Topu Rathod (New Name)**

## संपादकीय....

### दे धक्का...

महाराष्ट्रातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा रणसंग्राम अंतिम टप्प्यात आला असून, आज १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. राज्यातील सत्तेचे समीकरण ठरवणाऱ्या या मिनी विधानसभेत कोण बाजी मारणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. बहुतांश एक्झिट पोलमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. तर ठाकरेंना मात्र जोरदार धक्का बसणार असल्याचं सांगण्यात आलं आहे. त्यामुळे गेल्या २५ वर्षांपासून सत्तेत असलेल्या उद्धव ठाकरेंना हा धक्का असेल. मुंबई महापालिकेच्या २२७ जागांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान पार पडलं. त्याचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर करण्यात येणार आहे. त्या आधी या निकालाचा अंदाज वर्तवणारे एक्झिट पोल समोर आले आहेत. मुंबई महापालिकेसाठी जनमतचा एक्झिट पोल समोर आला आहे. त्यानुसार भाजप आणि शिंदे यांच्या युतीला १३८ जागा मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्याचवेळी ठाकरे बंधू आणि पवारांच्या राष्ट्रवादीला फक्त ६२ जागा मिळतील असं म्हटलंय. दुसरीकडे, काँग्रेस आणि वंचित आघाडीला २० जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्याचवेळी इतर पक्षांना ७ जागा मिळण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पुण्यात आज मतदान संपल्यानंतर प्रसिद्ध झालेल्या विविध एक्झिट पोल्सच्या आकडेवारीनुसार, पुणे महापालिकेत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे कठीण दिसत आहे. शहरात प्रामुख्याने भाजप, राष्ट्रवादी (अजित पवार गट), राष्ट्रवादी (शरद पवार गट), काँग्रेस आणि शिवसेना (दोन्ही गट) यांच्यात बहुरंगी लढत झाली आहे. पीआरएबी एक्झिट पोल्सच्या कलानुसार, भाजपला ९३ जागा मिळण्याचा अंदाज आहे. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार ४३ जागा, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेसला पुण्यात ८-८ जागा मिळतील. तर शिंदेंची शिवसेना ७ आणि ठाकरेंची शिवसेना पुण्यात ६ जागांवर जिंकेल असा अंदाज पीआरएबीने व्यक्त केला आहे. दरम्यान 'साम टीव्ही'चा सोलापूरच्या बाबतीत खळबळजनक एक्झिट पोल समोर आला आहे. या अंदाजानुसार, सोलापूर महानगरपालिकेत भारतीय जनता पक्ष स्पष्ट बहुमतासह सत्तेत येण्याची चिन्हे आहेत. डिसेंबर महिन्यापासून सुरू झालेल्या निवडणूक प्रचारात सोलापूरमध्ये महायुती आणि महाविकास आघाडीमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली. स्थानिक मुद्द्यांपासून ते राज्याच्या राजकारणापर्यंत अनेक विषय प्रचारात गाजले. अखेर आज मतदारांनी आपला कौल ईव्हीएमम ध्ये बंद केला आहे. दरम्यान, या एक्झिट पोलने विविध केंद्रांवर घेतलेल्या कलानुसार, सोलापूरकरांनी विकासाच्या मुद्द्यावर भाजपला झुकते माप दिल्याचे दिसत आहे. या एक्झिट पोलचा सर्वात मोठा धक्का काँग्रेस नेत्या प्रणिती शिंदे यांना बसण्याची शक्यता आहे. काँग्रेसला केवळ १२ जागांवर समाधान मानावे लागण्याची चिन्हे असून, भाजपच्या ६२ जागांच्या झंझावातापुढे काँग्रेसचा बालेकिल्ला धोक्यात आल्याचे चित्र आहे.

# महाराष्ट्रात प्रथमच पालघर जिल्हात साकार होणार बुद्धगया महाबोधी माहविहार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : तथागत भगवान बुद्धांना जिथे ज्ञानप्राप्ती झाली असे विश्वाचे वंदनीय ठिकाण म्हणजे बुद्धगया महाबोधी महाविहार याची प्रतिकृती महाराष्ट्रात प्रथमच पालघर जिल्ह्यात साकारणार आहे. बुद्धगया महाबोधी महाविहार प्रतिकृती म्हणजे महाबोधी विहाराची नक्कल किंवा छोटी रूपे जगभरातील बौद्ध विहारांमध्ये आणि धार्मिक स्थळांवर आढळतात जसे की थट्टा थट्टाहा महाबोधी पॅगोडा आणि थायलंड मधील काही विहारी आहेत जे बोधगयेतील मूळ विहारांची प्रतिकृती आहे . ठिकाण नारा फाटा, भिवंडी वाडा रोड, तालुका - वाडा , जिल्हा- पालघर येथे प्रतिकृतीचे नुकतेच भूमिपूजन पार पडले या विहारात वाचनालय , विपश्यना केंद्र असणार आहेत आणि बौद्ध धम्माचा प्रचार - प्रसार वाढावा म्हणून भिक्खु निवास देखील असणार आहे स्मृतीशेष भंते जिवंत धम्मो यांनी ही संकल्पना निर्माण केली होती हे विहार वाडा व भिवंडी तालुका साठी धम्म सेंटर असेल व भविष्यात पर्यटनाच्या दृष्टिकोनातून हे महत्त्वपूर्ण ठिकाण ठरेल, हे काम पूर्णत्वास नेण्याकरता बहुजन हिताय फाउंडेशन आणि श्रावस्ती बौद्ध शिक्षण संस्था नारे या दोन्ही नोंदणीकृत संस्था पुढाकार घेऊन काम पूर्णत्वास नेणार आहे. भूमिपूजनाच्या दिवशी विहारा करता दान देण्याचे आवाहन करण्यात आले तेव्हा जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंत लक्ष्मण सोनवणे यांनी ६६,६६६/- रू. धम्मदान घोषित केले त्याबद्दल त्यांचे मनापासून आभार व्यक्त करण्यात आले. यावेळी अशोक जाधव, रमेश भोईर, नरेश जाधव, नालंदा जाधव, छाया जाधव, श्याम जाधव, रमेश थूले ,विनीत सोनावणे, योगेश मोहिते, वैभव साळवे, विजय साळवे तर आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीस सुब्रमणिया शर्मा यांची ५ लाख रुपयांची देणगी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर येथे सुब्रमणिया शर्मा, रा. कोईम्बतूर (तामिळनाडू) यांनी भक्तीभावाने रु. ५,००,०००/- (अक्षरी रुपये पाच लाख) इतकी देणगी अर्पण केली आहे. सदर देणगी समितीकडे स्वीकारण्यात आली आहे.

या प्रसंगी देणगीदार सुब्रमणिया शर्मा यांचा सत्कार मंदिर समितीच्या सदस्या मा. श्रीमती शकुंतला ताई नडगिरे यांच्या हस्ते करण्यात आला. मंदिराच्या पवित्र कार्यासाठी दिलेल्या या उदार देणगीबद्दल मंदिर समितीच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# दिव्यांगांवर अन्यायाचा कळस! शयनयान व शिवाई बसमधून सवलत नाकारून शासनाची उघड बेपर्वाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : राज्य परिवहन महामंडळाच्या शयनयान व शिवाई या तथाकथित आधुनिक बस सेवांमधून दिव्यांग नागरिकांना प्रवास सवलत नाकारणे म्हणजे सामाजिक न्यायाची थेट हत्या आहे. दिव्यांगांना हक्क म्हणून मिळणारी सवलत डावलून शासनाने पुन्हा एकदा दुर्बल घटकांच्या जखमेवर मीठ चोळले आहे.

शासनाच्या घोषणा कागदावर आणि जाहिरातीपुरत्याच मर्यादित राहिल्या असून प्रत्यक्ष प्रवासात मात्र दिव्यांगांना पूर्ण तिकीट भरायला भाग पाडले जात आहे. हा निर्णय म्हणजे दिव्यांगां विरोधातील अमानुष, असंवेदनशील व अन्यायकारक धोरणाचा जिवंत पुरावा आहे.

दिव्यांग सवलत ही दया नाही, भीक नाही, तर घटनात्मक अधिकार आहे. तरीही शयनयान व शिवाई बस सेवांना सवलतीतून वगळून शासन जाणीवपूर्वक दिव्यांगांना आर्थिक लुटीला सामोरे जावे लागत आहे. हा अन्याय तात्काळ थांबवला नाही, तर राज्यभर रस्त्यावर उतरून लढा उभारला जाईल, असा इशारा दिव्यांग संघटनांनी दिला आहे.

आता गोड आश्वासनांना वेळ उरलेली नाही. शयनयान व शिवाई बसमधून दिव्यांगांना प्रवास सवलत तात्काळ लागू करा, अन्यथा हा प्रश्न आंदोलन, चक्का जाम आणि कायदेशीर लढ्याच्या मार्गाने अधिक तीव्र केला जाईल, अशी मागणी दिव्यांग संघटनेमार्फत परिवहन महामंडळाकडे करण्यात आलेली आहे.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियासाठी डोहोळे ग्रुप ग्रामपंचायतीत लाभणार कलाकारांची उपस्थिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाण/प्रतिनिधी : मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत भिवंडी तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे गावाच्या सर्वांगिण विकासासाठी आणि प्रगतीसाठी विशेष जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाला महाराष्ट्राचे लाडके कलाकार, 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम अभिनेता पृथ्वीक प्रताप व अभिनेत्री शिवाली परब हे १८ जानेवारी २०२५ रोजी ठीक सकाळी ९ वाजता ग्रुप ग्रामपंचायत डोहोळे येथे

उपस्थित राहून आपल्याशी संवाद साधणार आहे.चला एकत्र येऊया, डोहोळे ग्रामपंचायतीला व यात समाविष्ट गावांना समृद्ध बनवूया असा संकल्प यावेळी करण्यात आला आहे. तर यावेळी डोहोळे ग्रामपंचायत अधिकारी परेश सोनावणे आणि डोहोळे ग्रामपंचायतीने नागरिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे .

# २०३४च्या फुटबॉल विश्वचषकासाठी 'प्रोजेक्ट महादेवा' मधून गुणवान खेळाडू मिळतील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**महाराष्ट्रातून निवडलेल्या १३ वर्षाखालील ६० फुटबॉलपटूंना विशेष प्रशिक्षण शिबिर व मार्गदर्शन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : मिशन ऑलिम्पिक २०२६ अंतर्गत महाराष्ट्रातून अधिकाधिक सुवर्णपदके मिळवणे आणि २०३४ पर्यंत फुटबॉल विश्वचषकासाठी तयारीचे लक्ष्य ठेवून 'प्रोजेक्ट महादेवा' राबवण्यात येत आहे.या प्रोजेक्टमधून नक्कीच गुणवान खेळाडू मिळतील,अशी आशा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनातर्फे 'प्रोजेक्ट महादेवा' या राज्यस्तरीय क्रीडा उपक्रमाचा शुभारंभ आज वानखेडे स्टेडियम येथे करण्यात आला. 'प्रोजेक्ट महादेवा' हा उपक्रम महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (चखढठ), व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशन (तडढऋ), वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन (थखऋ), सिडको (उखऊज) आणि महाराष्ट्र शासनाचा क्रीडा विभाग या विविध संस्थांच्या विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी, अर्जेंटीनचे माजी खेळाडू लुईस सुआरेझ आणि रॉड्रिगो डिपॉल, क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे, खासदार प्रफुल्ल पटेल, भारतरत्न सचिन तेंडुलकर, भारतीय लोकप्रिय फुटबॉलपटू सुनील छेत्री, भारतीय फुटबॉल संघाचा कर्णधार राहुल भेके, महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्राचे)चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, श्रीमती अमृता देवेंद्र फडणवीस, गोट टूर प्रमोटर सत्तादूर दत्ता, टायगर श्रॉफ,

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि जागतिक फुटबॉलपट्टू लिओनेल मेस्सी यांच्या हस्ते प्रोजेक्ट महादेवा'चा शुभारंभ**



अजय देवगण, कार्तिक आर्यन, दिनों मोरिया, जिंदाल ग्रुपच्या पार्थ जिंदल, वेदना जिंदल यांनी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, 'प्रोजेक्ट महादेवा ' हा महाराष्ट्र शासनाचा महत्त्वाचा उपक्रम आहे, जो संपूर्ण राज्यात तरुण फुटबॉल मधील प्रतिभेचा (१३ वर्षांखालील) शोध घेवून फुटबॉल मधील उच्च दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी सुरू करण्यात आला आहे. या उपक्रमांतर्गत शिष्यवृत्ती, परदेशी प्रशिक्षकांकडून जागतिक दर्जाचे प्रशिक्षण आणि सर्वांगीण विकासाची संधी दिली जाणार आहे. निवडलेल्या ६० खेळाडूंची (३० मुले, ३० मुली) पाच वर्षांची संपूर्ण निवासी शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच अव्वल खेळाडू नक्कीच फिफा विश्वचषक मध्ये खेळतील अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही: सचिन तेंडुलकर**

भारतरत्न सचिन तेंडुलकर म्हणाले की, जागतिक फुटबॉलपटू लिओनेल मेस्सी आणि त्यांचे सहकारी भारतात आल्याबद्दल आणि तेही मुंबईत आल्याबद्दल सर्वांचे खूप खूप आभार मानतो.मुंबईकरांनी ज्या प्रकारे या तिघांचे स्वागत केले ते अत्यंत अविस्मरणीय आहे. मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे आजचा क्षण हा अत्यंत अविस्मरणीय आहे. प्रेक्षकांच्या पाठिंब्याशिवाय आपण मोठे होऊ शकत नाही. आज मला वानखेडे स्टेडियमवर झालेल्या सन २०११ च्या क्रिकेटच्या विश्वचषकाची आठवण झाली. आजचा क्षण हा सुवर्ण अक्षराने लिहिला जाईल. खेळामध्ये खेळाडूंना चिकाटी जिद्द अत्यंत महत्त्वाचे आहे लिओनेल मेस्सी जागतिक दर्जाचा खेळाडू असून त्याच्यामध्ये संवेदनशीलता त्याच प्रकारे त्यांनी या खेळाडूला दिलेल्या उत्तेजन अत्यंत महत्त्वाचे आहे याबद्दल मी मेसेज आभार मानतो आणि मेसीला व त्याच्या कुटुंबांना

# सांगोला भाजप स्वबळावर लढणार : जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सांगोला तालुक्यात जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक स्वबळावर लढणार असून आपण स्वतः चोपडी गटातूनन निवडणुकीत उतरणार असल्याचे भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतन सिंह केदार सावंत यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्याच्या पश्चिम भागातील सर्व तालुक्यात विशेषता बार्शी, करमाळा ,माढा, माळशिरस, सांगोला, पंढरपूर या तालुक्यात जिल्हा परिषद पंचायत समितीच्या निवडणुकी संदर्भात गट गणनिहाय बैठक घेऊन स्वबळाचा निवडणूक लढवण्यासाठी तयारी कार्यकर्त्याची झाली आहे परंतु जर वरिष्ठांनी काही तालुक्यात तेथील मित्र पक्षाबरोबर युती करून निवडणूक लढण्याची आदेश दिले तर युतीची तयारी असल्याचे केदार यांनी सांगितले यावेळी जिल्हा परिषदेत पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवण्याचे निर्धार कार्यकर्त्यांनी केला असल्याचे ते म्हणाले. केदार सावंत यांची मुळगाव वासुद असून हे गाव कडलाच गटात येते. परंतु हा गट सर्वसाधारण महिलासाठी राखीव असल्याने केदार सावंत यांनी सर्वसाधारण गट चोपडी यातून निवडणूक लढवण्याची निर्धार केला आहे.

# कौठाळी जि.प. शाळेत बालआनंद बाजार उत्साहात संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर तालुक्यातील कौठाळी येथील जि.प.प्राथमिक शाळेमध्ये बाल आनंद बाजार दिन उत्साहात संपन्न झाला.

प्रारंभि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ नागटिळक, उपाध्यक्ष मैना मुळे, सरपंच महादेव गाढवे, अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे पंढरपूर ता.अध्यक्ष रामदास नागटिळक यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून उदघाटन करण्यात आले.



विद्यार्थ्यांनी विविध प्रकारचे स्वादिष्ट खाद्यपदार्थ, भाजीपाला,फळे, स्टेशनरी, यांचे सुसज्ज स्टॉल उभारले होते. बाजार डे ला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळाला.

तसेच सदर उपक्रमासाठी सहकार्य करणार्या सर्व पालक, ग्रामस्थ, सरपंच, सर्व सदस्य,शालेय व्यवस्थापन समितीच्या सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. सूत्रसंचालन मुख्याध्यापिका सई शिंदे तर आभार सरिता साळुंखे यांनी मानले. यावेळी शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष सचिन आटकळे, शिवाजी नागटिळक, श्रीकांत नागटिळक, डॉ. दशरथ घोडके, भिमराव नागटिळक, सज्जन नागटिळक, अमोल आटकळे, प्रशांत कोरके आदीसह बहुसंख्य मान्यवर, पालख, विद्यार्थी उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील पाच विद्यार्थ्यांचे अध्ययन यात्रेसाठी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील हिंदी विभागातील बीए तीन मध्ये अध्यापन करीत असलेल्या कृष्णा शेलार, सलमान शेख, योगेश हांडे, चैतन्य भोंगे, व सुधीर काळे यांची दिनांक २२ जानेवारी ते एक फेब्रुवारी २०२६ अखेर छत्तीसगढ येथे हिंदी भाषा छात्र अध्ययन यात्रेसाठी निवड झाली सदर यात्रेचा सर्व खर्च मानव संसाधन मंत्रालय अंतर्गत केंद्रीय हिंदी निदेशालय

हिंदी (भारत सरकार) करते. हिंदी विभाग प्रमुख व महोदयालयाचे उपप्राचार्य डॉक्टर अनिल साळुंखे यांच्या प्रयत्नातून दरवर्षी हिंदीच्या विद्यार्थ्यांच्या निवडीसाठी प्रयत्न होतात सदर विद्यार्थ्यांच्या निवडीने विद्यार्थ्यांमध्ये हिंदी विषयाबद्दल आवड निर्माण होत आहे निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संस्थेचे सचिव विलासराव घुमरे, अध्यक्ष प्राचार्य मिलिंद फंड, प्राचार्य एपिमानी प्रा खरडमल व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले व अध्ययन यात्रेय शुभेच्छा दिल्या.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज : तहसीलदार सचिन लंगुटे

## ८ जिल्हा परिषद गट व १६ पंचायत समिती गणासाठी निवडणूक, ३०९ मतदान केंद्रे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद ८ गट व पंचायत समितीच्या १६ गणाच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली आहे. आदर्श आचार संहिता अंमलबजावणी व निवडणुका पारदर्शक व शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असल्याची माहिती सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली.

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक -२०२६ चा निवडणुक कार्यक्रम जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुक आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. पंढरपूर तालुक्यामध्ये जिल्हा परिषद गट एकूण ०८, पंचायत समिती गण एकूण -१६ आहेत.

पंढरपूर तालुक्यातील जिल्हा परिषद गट वाखरी, करकंब, भोसे, गोपाळपूर, टाकळी, कासेगाव, रोपळे, भाळवणी हे ८ जि.प. गट आहेत. तर पंचायत समिती गण उंबरे, करकंब, भोसे, गुरसाळे, रोपळे, सुस्ते, पुळूज, गोपाळपूर, वाखरी, पटवर्धन कुरोली, भाळवणी, पळशी, टाकळी, खर्डी, कासेगाव, सरकोली हे १६ गण आहेत. यासाठी ३०९ मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

**निवडणूक कार्यक्रमाची सुचना प्रसिध्द करण्याचा दि.१६ जानेवारी, नामनिर्देशन पत्र भरण्याचा कालावधी दि. १६ ते २१, नामनिर्देशनपत्र छाणनी दि.२२ रोजी तर याच दिवशी यादी प्रसिध्द होणार, दि. २३ ते २७ उमेदवारी अर्ज माघार, दि. २७ रोजी अंतिम उमेदवारांची यादी व चिन्ह वाटप, मतदान दि. ५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७.३० ते ५.३० वा. पर्यंत, मतमोजणी दि. ७ रोजी करण्यात येणार आहे.**

नामनिर्देशन अर्ज, त्यासोबत जोडावयाचे प्रपत्रे, छाननी, उमेदवार माघार, निवडणुक चिन्ह वाटप, मतदान दिवशी घ्यावयाची खबरदारी, अनामत रक्कम, मतमोजणी आदर्श आचार संहितेचे पालन करण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

८ जिल्हा परिषद गटासाठी ८ कर्मचारी तर १६ पंचायत समिती गणासाठी १६ कर्मचारी फॉर्म तपासणीसाठी नियुक्त करण्यांत आले आहेत. तसेच आचारसंहिता कक्ष तयार करण्यात आला असून यामध्ये गटविकास अधिकारी त्यांचे नोडल अधिकारी म्हणून काम पाहणार आहेत. हे आचार संहिता कक्ष पंचायत समिती, शेतकी भवन येथे असणार आहे. या कक्षात एक खिडकी कक्ष असणार असून येथे प्रचार संबधित सर्व परवानग्या दिल्या जाणार आहेत. तसेच एफएसटी, एसएसटी, व्हिएसटी पथकाव्दारे आचारसंहिता नियंत्रण केले जाणार असल्याचे सहाय्यक निवडणुक निर्णय अधिकारी तथा तहसिलदार सचिन लंगुटे यांनी सांगीतले.

## आर. के. पालवी शाळेतील कु. रुद्र मोरे एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत महाराष्ट्रातून चौथा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील आर.के.पालवी इंग्रजी शाळेतील इयत्ता आठवी मध्ये शिकणारा कु. रुद्र वसंत मोरे या विद्यार्थ्याने एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेत संपूर्ण महाराष्ट्रातून चौथा क्रमांक मिळवला असून आपल्या शाळेचे व परिसराचे नाव उज्वल केले आहे. सदर एलिमेंटरी ड्रॉइंग ग्रेड परीक्षेसाठी कला शिक्षिका नम्रता शेलार , शाळेचे मुख्याध्यापक रवींद्र पालवी यांचे मार्गदर्शन लाभले असून त्याच्या यशामुळे आपल्या पडघा गावाचे नाव राज्यात उंचावले आहे. तर आर.के. पालवी इंग्रजी शाळेतील शिक्षकांकडून व शाळेकडून अभिनंदन होत असून विविध स्तरावर कु. रुद्र वसंत मोरे या विद्यार्थ्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## हत्तर संग ग्रामदैवत श्री संगम्मा देवी यात्रा महोत्सवास मंगळवारपासून प्रारंभ



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : सालाबाद प्रमाणे याही वर्षी देखील सुचित्र हत्तरसंग ता.द. सोलापूर येथील ग्रामदैवत श्री संगम्मा देवी यात्रा महोत्सवास मंगळवारपासून प्रारंभ होणार असून मंगळवार दिनांक २०/१/२०२६ हे बुधवार ते दिनांक २८/१/२०२६ पर्यंत दररोज सायंकाळी ६.३० ते पर्यंत महा शिवराणी भीमा बीके इडली यांचे प्रवचन आयोजित करण्यात आले असून प्रवचनकार श्री शंभुलिंग शास्त्री गुरु हिरेमठ, रडगल तालुका आळंद जिल्हा गुलबर्गा (माणिक रत्न प्रशस्तीपत्र विजेता) यांच्या अमृत रसाळ वाणीचे संपन्न होणार आहे यांच्यासोबत संगीत सेवे श्री कलाप्पा गवळी गळू (आकाशवाणी दूरदर्शन कलाकार) बंटनहळी जिल्हा गुलबर्गा तर तबक खाल्ला वादक मल्लिकनाथ तोरणे (भूशाल जिल्हा कोलबर्गे यांच्या सहकार्याने प्रवचन होणार आहेआकाशवाणी दूरदर्शन कलाकार)

मंगळवार दिनांक २७/१/२०२६ रोजी रात्री १०.०० वाजता श्री संगमेश्वर भजनी मंडळ कुंडल श्री संगम्मा देवी भजनी मंडळ हत्तर संग श्री आदिशक्ती महिला मंडळ हत्तर संघ यांचे बहिणी कार्यक्रम होणार असून बुधवार दिनांक २८/१/२०२६ रोजी पहाटे ५.० वाजता महारुद्र अभिषेक व होम हवन तसेच सकाळी ८.० वाजता श्री संगम्मा देवी मूर्ती मिरवणूक व शस्त्र कुंभ मेळावा वीरभद्र पूर्वत कार्यक्रम संपन्न होणार त्यानंतर धर्मसभा सकाळी दहा वाजता होणार असून त्या धर्मसभेचे अध्यक्ष श्री म.नि.प. शिवानंद महास्वामीजी वीरभक्त मठ करज, अक्कलकोट जिल्हा सोलापूर नेतृत्व श्री वेमो महंत शास्त्री हिरमेट, प्रमुख अतिथी म्हणून श्री शेडसरी शास्त्री( कनेरी मठ कोल्हापूर,)

उत्तर संघ तालुका दक्षिण सोलापूर श्री आनंदशास्त्री वरुर, तालुका दक्षिण सोलापूर आणि श्री प्रशांत महाराज शंख तालुका जत जिल्हा सांगली यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे तरी श्री संगम्मा देवी यात्रा महोत्सव कार्यक्रमासाठी भक्तगणांनी सगळं हाताने मदत करावी आणि अत्तरसंग कुंडल पंचक्रोशातील सदभक्तांनी लाभ घ्यावा असे आव्हान यात्रा कमिटी कडून करण्यात आले आहे.

## हिपळे गाव झाले सौरऊर्जेबाबत आत्मनिर्भर, सौरऊर्जेतून आत्मनिर्भर होणारी जिल्ह्यातील पहिले गाव, अल्ट्राटेक चे महत्वपूर्ण योगदान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : दक्षिण सोलापूर तालुक्यातील हिपळे हे छोटेसे गाव विजेच्या बाबतीमध्ये आत्मनिर्भर होणारे पहिले गाव ठरले आहे. अल्ट्राटेक कंपनीने हिपळे गावाला ऊर्जेबाबत आत्मनिर्भर करण्यासाठीच्या शोधात होते. अखेर त्यांना हिपळे गाव विजयबाबत आत्मनिर्भर करण्यासाठी महावितरणने ही चांगला प्रतिसाद दिला आणि हिपळे गाव सौरऊर्जेच्या प्रकाशाने उजळून निघाले हे काम दोन टप्प्यांमध्ये हाती घेण्यात आले. पहिल्या टप्प्यात ५२ घरी आणि दुसऱ्या टप्प्यामध्ये २२ घरी अशा पद्धतीने ७४ घरावर उत्सव ऊर्जेचा संच बसवून हीपळे गावाला विजेच्या बाबतीमध्ये आत्म निर्माण करण्यात आले. यामध्ये गावातील लाभार्थ्यांकडून दहा टक्के वाटा या योजनेतून प्रत्येक लाभार्थ्याला मिळणारी अनुदान वजा करून उर्वरित पूर्ण रक्कम कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीच्या माध्यमातून भरण्यात आली व या काम गावच्या सरपंच माया पाटील यांनी देखील ग्रामस्थांना दहा टक्के निधी भरण्यासाठी प्रवृत्त केले आणि उर्वरित रक्कम २४ लाख ४३ हजार रुपये हे अल्ट्राटेक सिमेंटच्या वतीने भरण्यात आले आहेत या माध्यमातून पूर्ण हिवळे गाव सौरऊर्जेचा लक प्रकाशाने उजळून निघाले आहे.



गावातील प्रत्येक घरावर आता सौरऊर्जेचा संच बसविल्यामुळे नागरिकांना आता विजेची बिल येण्याची बंद झाले आहे.अतिरिक्त झालेली वीज निर्मिती ही महावितरण घेत आहे आता हेपळे हे गाव घरासाठी लागणाऱ्या विजय बाबत स्वयंपूर्ण झाल्या असून उर्वरित वीज ही महावितरणला दिल्यामुळे वीज निर्मितीमध्ये हेपळे गावाचेही योगदान मिळत आहे.

## एम.एड. सीईटी ऑनलाइन फॉर्म नोंदणीस प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : राज्य सामायिक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्षाने मास्टर ऑफ एज्युकेशन (एम.एड.) अभ्यासक्रमाच्या सीईटी नोंदणीस सुरुवात केली आहे. या परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज www.mahacet.org या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत. एम.एड. सीईटी परीक्षेची संभाव्य तारीख २५ मार्च असून त्यासाठी नोंदणी प्रक्रिया सुरू झाली आहे. बी.एड. उत्तीर्ण किंवा डी.एड. व पदवी परीक्षा उत्तीर्ण उमेदवार एम.एड. करण्यासाठी पात्र आहेत. म . वि.प्र समाजाच्या ड . विठ्ठलराव हांडे बी.एड महाविद्यालयात एम.एड. अभ्यासक्रम चालविला जातो. प्रवेशाविषयी अधिक माहितीसाठी डॉ. मनिषा चौधरी (चित्ते )(मो. ९४२१८८६२६०) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन प्राचार्य डॉ. चंद्रकांत बोरसे यांनी केले आहे.

## मराठवाडा विद्यापीठ नामविस्तार दिन आंबेडकरी अनुयायांच्या अस्मितेचा विजय असून नामांतर लढा हा कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आहे : एस. के. गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : तब्बल १४ वर्षाच्या संघर्षमय लढ्या नंतर पँथर गौतम वाघमारे, पोचीराम कांबळे सह अनेक भिम सैनिकांच्या बलिदानातून झालेला डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संभाजीनगर (औरंगाबाद) चा नामाविस्तार दिन म्हणजे आंबेडकरी अनुयायांच्या अस्मितेचा विजय असून नामांतर लढा हा चळवळीतील कार्यकर्त्यांना प्रेरणादायी आहे.असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे धाराशिव जिल्हा सचिव तथा पत्रकार एस.के. गायकवाड यांनी वागदरी तालुका तुळजापूर येथे आयोजित कार्यक्रमात बोलताना केले.





मकर संक्रांतीचे औचित्य साधून झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या ३२ व्या नामविस्तार वर्धापन दिना निमित्ताने वागदरी येथील पंचशील बुद्ध विहारात विद्यापिठ नामविस्तार वर्धापन दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी एस.के.गायकवाड बोलत होते.

प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन करून बुद्ध वंदना घेवून नामविस्तार दिनानिमित्ताने सामुदायिक रित्या तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी पोलीस हवालदार संदिपान वाघमारे अनिल वाघमारे चंद्रकांत वाघमारे,दात्ता झेंडारे, रमेश वाघमारे, सूर्यकांत वाघमारे तसेच माजी उपसरपंच कविता गायकवाड, श्रीदेवी वाघमारे,वंदना वाघमारे, ठकुबाई वाघमारे,स्वाती गायकवाड,अर्चना वाघमारे, सुगंधा वाघमारे,प्रमिला रमेश वाघमारे,सुषमा वाघमारे गीताबाई झेंडारे,उज्वला वाघमारे सविता वाघमारे राहीबाई वाघमारे सह शालेय विद्यार्थी महिला युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### निफाड येथे आ. सत्यजित तांबे यांचे हस्ते अभ्यासिकेचे उद्‌घाटन

# अभ्यासिकेतून भविष्यात हजारो विद्यार्थी घडतील, विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर लाभ घ्यावा : आ.सत्यजित तांबे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : जयहिंद युथ क्लब व निफाड नगरपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने उभारण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्र व अभ्यासिकेचे लोकार्पण आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा श्रिमती रत्नमाला ताई कापसे, होत्या तसेच व्यासपीठावर मा.नगराध्यक्ष राजाराम शेलार , उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे, नगरसेवक संदीप जेऊघाले, नगरसेविका शारदा कापसे, डॉ. कविता धारराव, नयना निकाळे, सचिन होळकर, सचिन खडताळे, शिवाजी ढेपले, विनायक शिंदे, संदीप शिंदे, सागर निकाळे, मधुकर शेलार, संपत कराड, रमेश जाधव, देवदत्त कापसे, स्वप्निल बिनायकिया तसेच मुख्याधिकारी धीरज भामरे आदी मान्यवर उपस्थित होते.

या प्रसंगी आमदार तांबे पुढे म्हणाले की, पालिकेने जागा दिली आणि मित्रपरिवाराच्या मागणीनुसार शासनाच्या माध्यमातून ही अभ्यासिका मंजूर करून आणली. आजचे युग हे स्पर्धेचे असल्याने विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाची नितांत गरज आहे. या अभ्यासिकेत केवळ स्पर्धा परीक्षेचाच नव्हे तर अभ्यासासोबत कला, क्रीडा आणि विविध स्पर्धात्मक उपक्रमांचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ते म्हणाले, विधिमंडळातील चहा-नाश्ता व जेवणावर मोठा खर्च होत असतानाही महाराष्ट्र कुपोषणात अग्रेसर असणे ही चिंताजनक बाब आहे. राज्यात अनेक महामंडळे असताना युवक कल्याण मंत्रालय नसणे दुर्दैवी आहे. विकास हा आपोआप होत नाही, तो खेचून आणावा लागतो. पंधराव्या वित्त आयोगाचा निधी वेळेवर न आल्यास शहर स्वच्छतेसाठीही अडचणी निर्माण होतील, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

निफाड शहराचा विस्तार सुमारे २६ किलोमीटरपर्यंत वाढला असून निफाडकरांनी नेहमीच आपल्याला पाठिंबा दिला आहे. त्यामुळे निफाडच्या विकासासाठी मदत करणे हे आपले कर्तव्य असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.





यावेळी स्पर्धा परीक्षेत यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच पत्रकार दिनानिमित्त उपस्थित पत्रकारांचा सन्मान आमदार सत्यजितदादा तांबे यांच्या हस्ते करण्यात आला. राजाराम शेलार यांनी अध्यक्षीय मनोगतातून शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात अनिल कुंदे यांनी नगरविकास विभागांतर्गत या स्पर्धा परीक्षा केंद्राचे उद्घाटन झाल्याचे सांगत, विकासकामांसाठी आमदार तांबे नेहमीच पाठिशी उभे राहिल्याबद्दल आभार मानले. माजी नगरसेवक देवदत्त कापसे व नगरसेविका शारदा कापसे यांनीही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले, तर युवक काँग्रेसचे तालुका अध्यक्ष सचिन खंडताळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीणचे कर्मचारी यांचे वेतनासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे...!

## कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांचा पुढाकार; वेतनासाठी मुख्यमंत्री कार्यालयातून हालचाली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका):– जलजीवन मिशन व स्वच्छ भारत मिशन ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यात जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षात विविध पदावर कंत्राटी तत्त्वावर कर्मचारी कार्यरत कर्मचारी यांचे चार महिने–चे वेतन शासनाकडे प्रलंबित आहे. या मागणी साठी कंत्राटदार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद भोसले यांनी पुढाकार घेतला आहे.

सोलापूर येथे राज्य पाणी व स्वच्छता कृती समितीचे वतीने कृती समितीचे अध्यक्ष रमाकांत गायकवाड व कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी अध्यक्ष मिलिंद भोसले यांची शिष्ट मंडळासह भेट घेतली. मिलींद भोसले यांनी जलजीवन मिशन चे कर्मचारी यांचा दिपावलीतील दोन महिनेचे



थकित वेतन देणेसाठी प्रयत्न केला होता. त्यात त्यांना यश आले होते.

राज्य स्तरावर निधी उपलब्ध असूनही तांत्रिक कारण पुढे केलेमुळे कर्मचारी यांना चार महिने वेतन नाही. सदर विभागासाठी राज्य शासनाकडून कर्मचारी यांचे वेतनासाठी १० कोटी इतका निधी नियतव्यय मंजूर आहे. सदर निधी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास प्राप्त होईपर्यंत उपलब्ध निधीतून सदर कर्मचारी यांचे वेतन अदा करणेत आलेले नाही.

राज्य सन २००३ पासून टप्प्याने भरतीनुसार हे कर्मचारी कार्यरत आहेत. १ नोव्हेंबर २०१२ च्या शासन निर्णयाद्वारे जिल्हा स्तरावर राष्ट्रीय पेयजल कार्यक्रम व निर्मल भारत अभियान या प्रकल्पासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष ची स्थ–ापना करून यामध्ये जिल्हा व तालुकास्तरावर कंत्राटी कर्मचारी यांचे कार्यपूर्ती जबाबदारी व फलनिष्पती निश्चित करून राज्य शासनाकडून पाणी व स्वच्छता कामाचे सनियंत्रण केले जात आहे.

जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष स्थापन केलेपासून महाराष्ट्र शासनाचा पाणी व स्वच्छतेच्या कामात केंद्र शासनाकडून नेहमी गौरव करण्यात आलेला आहे. या कार्यरत शासकीय कंत्राटी कर्मचारी यांनी गेली २० वर्षे केलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे या क्षेत्रात महाराष्ट्र राज्य नेहमी अग्रेसर राहिला आहे.

परंतु सध्यस्थिती पाहता सदर कर्मचारी यांचे ४ महिन्यापासून वेतन अदा केलेले नाही.त्यामुळे या कार्यरत कर्मचारी यांचे कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. राज्य स्तरावर केंद्र शासनाचा निधी उपलब्ध आहे. तरीसुद्धा राज्य पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचा नियोजनाचा अभाव असल्यामुळे सदर कर्मचारी यांना विनाकारण फटका सोसावा लागत आहे.

या परिस्थितीमुळे कर्मचारी यांचे दैनदिन खर्च व गरजा भागविणे,कर्जाचे हप्ते वेळेवर भरणा करणे, कुटुंबाची उपजीविका चालू ठेवणे अशक्य होत आहे. बँकाचे हप्ते न गेलेमुळे बँकांनी कर्मचारी यांचे सीबील खराब केले आहे. याकरिता सर्व कर्मचारी यांनी विभागाशी संपर्क करून याबाबत विचारणा केली आहे. मात्र अपेक्षित प्रतिसाद मिळाला नाही. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून वेतन मिळणेसाठी त्यांचे कडून कोणताही प्रतिसाद मिळत नाही. त्यामुळे सदरचे कर्मचारी नैराश्यामध्ये आहेत. सदरचे वेतन अल्पशा असल्यामुळे या उद–ासीनतेचा परिणाम त्यांचे वैयक्तिक जीवनावर भविष्यात बेतनेची शक्यता आहे. वेतन अदा करणेबाबत सहानभूतीपुर्वक विचार व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निवेदन देणार आहेत.अस–ेही कार्याध्यक्ष सचिन जाधव यांनी सांगितले.

### विशेष कार्यकारी अधिकारी मोकाशी यांचेशी संपर्क : मिलिंद भोसले

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील १६०० कर्मचारी यांचे वेतन तीन महिने पासून नाही. आज मुख्यमंत्री कार्यालयातील विशेष कार्यकारी अधिकारी सिध्देश्वर मोकाशी यांचेशी संपर्क साधला असता ही बाब मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निदर्शनास आणून देणार असल्याचे मोकाशी यांनी सांगितले.**

---

### आघोरी पद्धतीचे रिंगण परीवारात भितीचे वातावरण

## डिग्रस बु.येथील सैय्यद कलीम यांच्या अंगणात जादुटोणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

अंढेरा पोलिस स्टेशन अंतर्गत येत असले डिग्रस बु.तालुका देऊळगाव राजा जिल्हा बुलढाणा येथील रहिवासी असलेले.सैय्यद कलीम यांच्या राहत्या घरासमोर रात्री च्या वेळी गोल रिंगण मारुन गुलाल गोटे काळ्या रंगाचे बाहुले सकाळी उठल्या नंतर पाहाव्यास मिळाले .व सैय्यद कलीम यांची पत्नी यास्मिन या महीलेच्या अंगावरती काळे डाग उमटण्यास सुरुवात झाली व अंगात आग होणे अश्या भयानक वेदना सुरू झाल्या असता त्यांनी अनेक हाँस्पिटल मध्ये उपचार असता वेदना थांबता थांबेना. परंतु आदल्या दिवशी शेजारच्या व्यक्ती शी जागेवरून वाद झाल्याने .शेजरची व्यक्ती अघोरी जादुटोणा करण्यास माहेर असल्याने .त्याच व्यक्तीने गोटे आणण्यास सुरुवात केली.असा संशय परीवाराने व्यक्त केला.असता .व अंढेरा पोलिस स्टेशन ला तक्रार दाखल करण्यास गेले असता त्यांनी कुठल्याही प्रकारचे गुन्हे दाखल केले नसल्यानें . यास्मिन सैय्यद कलीम यांनी पोलिस उपविभागीय अधिकारी देऊळगाव राजा यांना सविस्तर गैर अर्जदाराच्या नाव–ाने निवेदन देऊन जादुटोणा अघोरी प्रथा अंधश्रद्धा प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करण्यास पोलिस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देऊन अद्याप प्रर्यंत कुठलेच गुन्हे दाखल झाले नाही.

**जादुटोणा अघोरी प्रथा अंधश्रद्धा प्रतिबंधक कायदा अंतर्गत कारवाई करा पोलिस उपविभागीय अधिकारी यांना निवेदन**



---

## पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक दशरथ वाघमोडे यांनी पंढरपूर शहराचा कार्यभार स्वीकारला असल्याने त्यांचा यथोचित सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई यांच्या वतीने पश्चिम महाराष्ट्राचे अध्यक्ष राजेंद्र कोरके पाटील यांच्या शुभहस्ते श्री पांडुरंग यांची प्रतिमा भेट देऊन पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला. यावेळी संघटनेचे कार्याध्यक्ष प्रमोद भोसले, संघटनेचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेश बादले पाटील, संघटनेचे सचिव कुमार कोरे, आधी जण मान्यवर उपस्थित होते.




---

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त अभिवादन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दिनांक १४ जानेवारी २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नामविस्तार दिनानिमित्त भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी विभागप्रमुख अनिल कारंडे, डॉ बबन जोगदंड, शुभांगी पाटील यांनीही अभिवादन केले. बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

## निफाड नगरपंचायतीच्या वतीने निफाड शहरात नायलॉन मांजा वापर करणाऱ्यावर कारवाई करून नायलॉन मांजा जप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत मार्फत मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पतंग उडवण्यासाठी नायलॉन मांजा वा–परामुळे पक्षी, प्राणी तसेच नागरिक यांना इजा होऊन त्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असल्याने मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पतंगांसाठी नायलॉन मांजा वा–परावर बंदी करण्यात आली आहे, त्यास अनुसरून नगरपंचायत मार्फत नायलॉन मांजाच्या खरेदी व विक्री वर बंदी घालण्यात आली आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी निफाड नगरपंचायत कडून पथक स्थापन करण्यात आले असून पथकाद्वारे दि.१४/०१/२०२६ नगरपंचायत पथकामार्फत शहरातील बाजारपेठ, कुंदे गल्ली व इतर ठिकाणी पतंग उडविणाऱ्या नागरिकांवर कारवाई करून पतंग व नायलॉन मांजा जप्त करण्यात आले.

मकर संक्रांत निमित्त आकाशात रंगीबेरंगी पतंग पाहायला मिळतात मात्र या पतंगीला जो नायलॉन मांजा वापरला जातो तो पर्यावरण व नागरिकांना धोका निर्माण होत आहे. त्यामुळे या मांजावर नियंत्रण मिळवण्यासाठी निफाड नगरपंचायत मुख्याधिकारी धीरज भामरे यांच्या मार्गदर्शना खाली विशेष मोहीम राबविण्यात येत असून शहरात मांजा विक्री करणाऱ्या दुकानांवर नगर परिषदेचे अधिकारी श्रीम.मयुरी नवले,. अनिल गंदमवाड,राहुल लामखेडे कर्मचारी दिनेश सोनवणे, दिप–ाली गिते,कुणाल खाडे,राजू कापसे सुनील गांगुर्डे, बिलाल उस्मान पठाण,संकेत मोगरे यांनी माणकेश्वर चौक,उगाव रोड येथील दुकानाची तपासणी केली आहे. नायलॉन मांजा वापर करणाऱ्या नागरीक यांचे कडील नायलॉन मांजा जप्त करण्यात आला.तसेच भविष्यात नायलॉन मांजा वापर करताना सापडल्यास कडक कारवाई करण्यात येईल याची नोद घ्यावी. तसेच शहरातील नागरिकांनी नगरपंचायतीस सहकार्य करावे.

---

### कर्मवीर इन्स्टिट्यूट मध्ये मराठी भाषा संवर्धन पंधरवडा उत्साहात

### डॉ. एस. पी .पाटील यांचे प्रतिपादन

## वाचन हीच यशस्वी अभियंत्याची खरी ओळख

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

वद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन त्यांचा सर्वांगीण विकास व्ह–ावा. या उद्देशाने कर्मवीर इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पंढरपूर येथे मराठी भाषा संवर्धन पंधरवडा बुधवार दिनांक १५ जा–नेवारी २०२६ रोजी विविध उपक्रमाच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. तांत्रिक शिक्षणाबरोबरच मनाची मूल्ये सजनशीलता व विचार क्षमतेचा विकास व्हावा, हा या उपक्रमाचा मुख्य हेतू होता.

वाचन पंधरवड्याच्या निमित्ताने ग्रंथ प्रदर्शन, तांत्रिक व अवतांत्रिक पुस्तकाचे वाचन, पुस्तक परीक्षण तसेच थोर शास्त्रज्ञ व साहित्यिकांच्या ग्रंथाचे व पुस्तकाचे प्रदर्शन यावेळी आयोजित करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एक चांगला



अभियंता होण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसून वाचनातून येणारी व्यापक दृष्टी मूल्य निष्ठा व नैतिकता तितकीच महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी अभियांत्रिकी विषयाबरोबरच आत्मविश्वास, व्यक्तिमत्व विकास आणि सामाजिक जाणीव वाढवणाऱ्या या पुस्तकाचे वाचन करून परिपूर्ण व्यक्तिमत्व घडविले पाहिजे तसेच लुप्त होत असलेली वाचन कला सर्वांनी बुद्धीगत करावी हाच या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ग्रंथालय वापर वाढला असून वाचन सोखुदी ज्यांना मिळाल्यामुळे चित्र दिसून आले आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थित आणि व्यक्त केली.

श्री पांडुरंग प्रतिष्ठानचे चेअरमन रोहन परिचारक यांनी या कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या. हो यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर एस पी पाटील कर्मवीर पॉलिटेक्निकल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर ए बी कणसे, रजिस्टर गणेश वाळके, उपप्रा–चार्य प्राध्यापक जगदीश मुळेगावकर, संशोधन अधिष्ठाता डॉक्टर अभय उत्पाद शैक्षणिक अधिष्ठाता प्राध्यापक राहुल पांचाळ विभाग प्रमुख डॉक्टर एस एम लंबे डॉक्टर एस बी एकलारकर डॉक्टर अनिल बाबर प्राध्यापक दीपक भोसले तसेच सर्व प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथपाल सहाय्यक गणेश येडगे व चंद्रकांत गाडगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## जिल्हास्तरीय विज्ञान गणित पर्यावरण प्रदर्शनात शारदा इंग्लिश स्कूलचे घवघवीत यश



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर शिक्षण विभाग जिल्हा परिषद धाराशिव जिल्हा विज्ञान अध्यापक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ व्या जिल्हास्–तरीय बालवैज्ञानिक विज्ञान, गणित व पर्यावरण विज्ञान प्रदर्शन श्री.तुळजाभवानी सैनिकी विद्यालय तुळजापूर येथे दि. १२व १३ रोजी पार पडले याचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच मान्यवरांच्या हस्ते उत्साहात पार पडला.

या प्रदर्शनात तालुक्यातील निवड झालेल्या शाळांनी प्राथमिक,माध्यमिक,उच्च माध्यमिक गटातून एकूण ६० स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

यामध्ये शारदा इंग्लिश स्कूल डिकसळ च्या प्राथमिक गटामध्ये हिंदवी कचरे, वरद मालपाणी, राजनंदनी कदम यांनी तर प्राथमिक गट ( दिव्यांग ) या मध्ये ज्योती गोंदकर हिने सहभाग नोंदविला होता. यामध्ये प्राथमिक गटातून हिंदवी कचरे,वरद मालपाणी राजनंदिनी कदम यांच्या प्रकल्पाला द्वितीय क्रमांक मिळाला.

तसेच प्रकल्पाची निवड विभागीय स्तरावर झाली आहे. याबद्दल विद्यार्थ्यांचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. हा प्रकल्प तयार करण्यासाठी श्री.युनूस सर,श्री.भोजने सर, शाळेचे प्राचार्य श्री.भूषण सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मार्गदर्शक शिक्षकांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेच्या मार्गदर्शिका सौ.अर्चनाताई रमेशराव आडसकर व रणजीत आडसकर यांनी केले. तसेच शाळेतील प्राचार्य श्री भूषण सर व सर्व शिक्षक वृंद यांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.